संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

अग्रलेखांचा बादशहा

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

# यावेळची निवडणूक लोकशाहीतले परिवर्तन नोंदवणारी

लोकसभा निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्याचे मतदान आता राहिले आहे. १६ मे रोजी गेला महिना दीड महिना सुरू असलेल्या निवडणुकीच्या रणधुमाळीचा अंतिम निकाल लागेल. केंद्रामध्ये कोणाची सत्ता येईल कोण पंतप्रधान होईल कोणत्या पक्षाला बहुमत असेल की त्रिशंकू लोकसभा येईल किंवा नाइलाजाने पुन्हा एकदा देशाला आघाडी सरकार स्वीकारावे लागेल आणि पुन्हा एकदा सामना करण्याची वेळ येईल या सगळ्या प्रश्नांची उत्तरे १६ मे रोजी मिळतील. परंतु भारतीय लोकशाहीच्या ६५ वर्षांच्या प्रवासामध्ये होत असलेल्या या १६ व्या लोकसभेच्या निवडणुकीने निश्चितपणे काही परिवर्तनाच्या दिशा दाखवलेल्या आहेत त्याची नोंद घेणे आवश्यक ठरते. सत्तेच्या साठमारीमध्ये आणि अगदी थेट व्यक्तिगत आरोप-प्रत्यारोपांच्या चिखलफेकीत राजकीय पक्ष दंग आहेत. अनेक राजकीय विश्लेषकांनीसुद्धा या गोष्टीकडे पाहिजे तितके लक्ष दिलेले दिसत नाही. लोकशाहीच्या परिवर्तनाच्या प्रवासातल्या या महत्त्वपूर्ण टप्प्याची नोंद होणे इतिहासाच्या दृष्टीने आवश्यक ठरते. कारण निवडणुका म्हणजे केवळ सत्तेचा बाजार, निवडणुका म्हणजे केवळ मतांचा व्यवहार, एवढ्या मर्यादित अर्थाने निवडणुकीकडे पाहून चालणार नाही. ज्या निवडणुकांमधून लोकशाही कार्यपद्धतीचा आयाम निश्चित होतो. ज्यामधून एका सार्वभौम राज्यव्यवस्थेची निश्चितता होत असते. त्या निवडणुकीत जर काही बदल आढळून येत असतील तर त्याचे स्वागत केले पाहिजे. यावेळच्या निवडणुकीने प्रामुख्याने तीन गोष्टींबाबत परिवर्तनाचा कौल दिलेला दिसून येतो. ज्याचा प्रत्यक्ष सत्तेशी काहीही संबंध नाही. फक्त लोकशाही व्यवस्थेच्या भवितव्यासाठी हा कौल आम्हाला जास्त महत्त्वाचा वाटतो. या तीन गोष्टी म्हणजे यंदाच्या निवडणुकीत पहिल्यांदाच मतांची टक्केवारी सरासरी दहा टक्क्यांनी वाढलेली दिसून आली. टक्केवारीच्या पलीकडे जाऊन लोकांमध्ये एकूणच निवडणूक प्रचार लोकशाही व्यवस्था आणि त्यातला नागरिक म्हणून आपला मतदानाचा अधिकार याविषयी नेहमीपेक्षा अधिक जागृती पहायला मिळाली. ती नोंदली गेली.दुसरे वैशिष्ट्य म्हणजे यंदाच्या लोकसभा निवडणुकीत तरुण मतदार मोठ्या प्रमाणावर मतदानाला उतरल्याचे आढळून आले आणि तिसरे वैशिष्ट्य म्हणजे जवळपास सगळ्याच राजकीय पक्षांनी आपल्यातल्या धुरिणांना बाजूला सारून तरुण नेतृत्वाकडे धुरा सोपवण्याची प्रक्रिया या निवडणुकीतून सुरू झाल्याचे स्पष्टपणे दिसून आले. म्हणूनच निवडणुका म्हणजे केवळ सत्तापरिवर्तन किंवा निवडणुका म्हणजे केवळ नव्या सरकारला निवडून देणे एवढ्यापुरता त्याचा अर्थ न घेता लोकशाहीसाठी नवी दिशा नक्की करणे हे परिवर्तनसुद्धा लक्षात घेतले पाहिजे.

### युवकांचा मोठा सहभाग

देशामध्ये पहिल्यांदाच एका वेगळ्या प्रकारच्या उत्साहाचा अनुभव या निवडणुकीतून पहायला मिळत आहे. मतदानाची टक्केवारी केवळ दहा टक्क्यांनी जरी वाढली असली तरी तरुणांमधला उत्साह हा वाखाणण्यासारखा ठरला. अजूनही शेवटच्या टप्प्यामध्ये प्रचाराचे जे चित्र पहायला मिळत आहे त्यातूनही हा उत्साह नजरेत भरण्याजोगे आहे. आता या सगळ्या उत्साहातून प्रत्यक्ष सत्ता परिवर्तन व्हायलाच पाहिजे असा अर्थ काढण्याची गरज नाही. सत्तापरिवर्तन झाले नाही तरी चालेल परंतु लोकांच्या लोकशाहीविषयक जाणिवा प्रगल्भ होणे ही निवडणूक सत्तापरिवर्तन घडवून आणू शकते ती केवळ सत्ताधाऱ्यांपुरती निगडित नाही तर ती आपल्या दैनंदिन जीवनाशीसुद्धा संबंधित आहे ज्यामधून प्रत्येक व्यक्तीला आपल्या हक्कांची अधिकारांची आणि त्याहीपेक्षा आपण या देशाचे एक जबाबदार नागरिक आहोत याविषयीची एक महत्त्वपूर्ण जाणीव ठळकपणे नोंदली गेली. ही गोष्ट लोकशाही व्यवस्थेसाठी आम्हाला महत्त्वपूर्ण वाटते. दुसऱ्या वैशिष्ट्याची तर इतिहासालाच नोंद घ्यावी लागेल. कारण तरुण मतदारांमधला उत्साह किंवा आपला मतदानाचा पहिला अधिकार गाजवण्याविषयीची जिज्ञासा मोलाची म्हटली पाहिजे. कारण आजचा तरुण हा आधीच्या पिढीपेक्षा अधिक कृतिशिल विकासाविषयी ठोस भूमिका असलेला आणि एकूणच देशाच्या भवितव्याचा गंभीरपणे विचार करणारा आहे. म्हणून त्याचीही मतदानातली कृतिशीलता म्हणजे लोकशाही व्यवस्थेविषयी त्याने दाखवलेली विशेष आस्था आहे. जी आतापर्यंतच्या निवडणुकांमध्ये पहायला मिळाली नव्हती. निवडणूक म्हणजे जणूकाही राजकारणातल्या एका ठरावीक वर्गाचीच मक्तेदारी आहे. जणूकाही त्यांनी ते क्षेत्र स्वत:साठी आंदण म्हणून स्वीकारले आहे त्याच्याशी आपला काही फारसा संबंध नाही म्हणून मतदानामध्ये तरुणांचा फारसा सहभाग दिसत नव्हता.

### तंत्रज्ञानाचा अभूतपूर्व वापर

तिसरी एक महत्त्वाची नोंद या निवडणुकीमध्ये झाली आहे, ती म्हणजे अनेक राजकीय पक्षांमधले धुरिण किंवा वयोवृध्द नेत्यांना बाजूला करून त्यांच्यापेक्षा कार्यक्षम आणि वयाने कमी असलेल्या नेत्यांकडे पक्षाची जबाबदारी सोपवली गेली. मग काँग्रेसमधले राहुल गांधींचे आगमन प्रियांका गांधींनी दाखवलेला मोदींविरुध्दचा आक्रमकपणा भाजपामध्ये लालकृष्ण अडवाणींना बाजूला करून नरेंद्र मोदींना पुढे करण्याचा निर्णय उत्तर प्रदेशात अखिलेश यादव या तरुण नेत्याकडे असलेली समाजवादी पक्षाची सूत्रे करुणानिधींनी त्यांच्या मुलाकडे सोपवलेला पक्षाचा भार महाराष्ट्रात शरद पवारांनी निवडणूक न लढवता अजित पवार, सुप्रिया सुळे यांच्याकडे दिलेली जबाबदारी अर्थात भाजपा वगळता अजूनही अनेक पक्षांनी पिढीजात आपली राजकीय घराणी टिकवण्याचा केलेला हा प्रयत्न आहे. तरीदेखील बदलता काळ लक्षात घेऊन आपण बाहेर पडले पाहिजे याची जाणीव अनेक धुरिणांना झाली हे देखील यावेळच्या निवडणुकीचे नोंद घेण्यासारखेच वैशिष्ट्य ठरते. अर्थातच या निवडणुकीच्या प्रचारामध्ये तंत्रज्ञानाचा अभूतपूर्व वापर झाला. ट्विटर, फेसबुक किंवा एसएमएससारख्या माध्यमांचा वापर केल्यामुळे अनेकबाबतीत निवडणूक किंवा लोकशाही या संदर्भामध्ये ताजी किंवा जिवंत चर्चा घडून आली. ही सगळी लक्षणे लोकशाहीतल्या परिवर्तनासाठी दिशादर्शक आहे याचे स्वागत केले पाहिजे.